# सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

**योजनेचे स्वरुप:**

आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक आविशी/2009/प्रक्र.20/का.12, दि.31 मे 201 (अ) अन्वये इयत्ता 1 ली ते 10 वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक तसेच इतर किरकोळ खर्च भागविण्यासाठी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व-माध्यमिक शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष 2010-11 पासून लागू करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत देण्यात येणा-या शिष्यवृत्तीचे वार्षीक दर (प्रती विद्यार्थी/विद्यार्थीनी) खलीलप्रमाणे आहे. 1) इयत्ता 1 ली ते 4 थी रु. 1000/- 2) इयत्ता 5 वी ते 7 वी रु. 1500/- 3) इयत्ता 8 वी ते 10 वी रु. 2000/- सन 2015-16 पासुन सदर योजना ही ऑनलाईन करण्याकरीता http;//etribal.maharashtra.gov.in ही वेबसाईट विकसित करण्यात आलेली आहे.

**लाभार्थी पात्रता:**

आदिवासी विकासविद्यार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रुपये 1.08 लाख किंवा त्यापेक्षा जास्त नसावे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याची उपस्थिती प्रतीमाह 80 टक्के असणे आवश्यक राहील. शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, नामांकित शाळा, सैनिकी शाळा, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा खर्च शासनाकडून अदा करण्यात येत असल्यास अशा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे:**

मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे प्रमाणपत्र शिष्यवृत्तीचा लाभ घेवू इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र सरपंच किंवा ग्रामपंचायत यांचेद्वारा प्रमाणित केलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र बँकेच्या पासबुकाची छायांकित प्रत

**चालु आर्थिक वर्ष सन 2021-22:**

मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचे कडील आदेशान्वये सुवर्ण महोत्सवी आदावासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजने अतंर्गत सन 2021-22 वर्षासाठी खालील प्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे. सदर पत्रा नुसार ओटीएसपी रक्कम रु.13,61,11,117 /- टीएसपी रक्कम रु.7,98,89,000 /- सन 2021-22 साठी एकुण रक्कम रु.14,41,00,137 /- प्राप्त झालेली असुन सदर रकमेचे वितरण शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना लाभ देणे कामी मुख्याध्यापक यांच्या बँक खाते वर्ग करण्याची कार्यवाही सुरू आहे.

| **योजनेचे नाव व लेखाशिर्ष** | **प्राप्त तरतुद सन 2021-22** | **लाभार्थी विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|
| सु.महो.शिष्य.योजना टीएसपी | 79,89,000 | 6,780 |
| सु.महो.शिष्य.योजना ओटीएसपी | 13,61,11,137 | 95,686 |
| **एकुण** | **14,41,00,137** | **1,02,466** |